निवडणूक तात्काळ/ई-मेलव्दारे

ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात महत्त्वाचे निर्देश.

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक:रानिआ/ग्रापंनि-२०१५/प्र.क्र.१६/का-८
नवीन प्रशासन भवन,मंत्रालयासमोर,
मादाम कामा मार्ग,मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :-३०/०९/२०१५

प्रति,
जिल्हाधिकारी (सर्व),
*(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).*

**विषय :- ग्रामपंचायत निवडणुकांसंदर्भात महत्त्वाचे निर्देश.**
**संदर्भ :-** आयोगाचा समक्रमांकाचा दि.२८/०९/२०१५ रोजीचा निवडणूक कार्यक्रम.

महोदय/महोदया,

उक्त संदर्भीय पत्रानुसार ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक व पोट निवडणुकांसाठी आयोगाकडून दि.२८/०९/२०१५ रोजी घोषित करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमासंदर्भात खालीलप्रमाणे महत्त्वाचे निर्देश देण्यात येत आहेत :-

१. ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्रे संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करण्यासंदर्भात दि.२८/०९/२०१५ रोजीच्या निवडणूक कार्यक्रमाच्या ९.३ मध्ये दिलेल्या निर्देशाबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून अपेक्षित आहे.

"ग्रामपंचायत निवडणुकीत उमेदवाराने सादर केलेल्या नामनिर्देशनपत्रासोबतच्या घोषणापत्रात एखादा रकाना रिक्त राहिला आहे केवळ या कारणास्तव उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र नाकारण्यात येऊ नये.

तसेच, उमेदवाराने सादर केलेल्या घोषणापत्रात एखादा रकाना रिक्त राहिल्यास प्रथम संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने त्या उमेदवारास छाननीच्या वेळेपर्यंत किंवा छाननी संपेपर्यंत तो रकाना / रकाने भरण्याची संधी द्यावी. तसेच छाननीनंतर त्या उमेदवाराच्या घोषणापत्राबाबत आक्षेप घेणारे अर्ज प्राप्त झाल्यास निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने संबंधित उमेदवारास त्या आक्षेपाबाबत कळवून, उमेदवारास सुधारीत घोषणापत्र सादर करण्याची किंवा प्राप्त आक्षेपाबाबत उमेदवाराचा खुलासा सादर करण्याची संधी त्याला देण्यात यावी व तो देखील प्रसिध्द करावा."

२. या निवडणुकीसाठी ऑनलाईन नामनिर्देशनपत्र भरताना केवळ आज्ञावली सुलभ होण्याच्या **दृष्टीने ग्रामपंचायतींच्या प्रत्येक प्रभागाची त्यातील दोन किंवा तीन जागांनुसार A, B & C अशा आद्याक्षरांमध्ये विभागणी करण्यात आलेली आहे.** तथापि, ग्रामपंचायत निवडणूक अधिनियम व नियमात या प्रमाणे वर्गवारीची ( A, B & C ) तरतूद नसल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून पदाचा तपशिल लिहीताना A, B & C चा वापर करण्यात येऊ नये. तसेच प्रभागातील प्रत्येक वर्गवारीच्या जागांसाठी (उदा. ना.मा.प्र. (स्त्री) किंवा खुला (अनारक्षित) प्रवर्गाच्या एकाच प्रभागात दोन जागा असल्यास) मतपत्रिका ही एकच असल्याने या वर्गवारीसाठी एक किंवा एकापेक्षा जास्त जागा उपलब्ध असल्यास त्यांची निवडणूक प्रक्रिया सामायिक असल्याने, या जागांसाठी प्राप्त झालेले उमेदवारी अर्ज हे त्या प्रत्येक जागेसाठी ( A, B & C ) स्वतंत्र गृहीत न धरता, प्रभागातील त्या वर्गवारीच्या सर्व जागांसाठी प्राप्त झाले असल्याचे गृहीत धरावे व त्या अनुषंगाने उमेदवारी निश्चित करावी. उदा. एका प्रभागात B & C ह्या दोन्ही जागा सर्वसाधारण प्रवर्गातील असल्यास, B & C साठी प्राप्त झालेले सर्व अर्ज एकत्र करून उमेदवारांची संख्या निश्चित करावी.

वरील निर्देशांबाबत तहसिलदार यांच्यामार्फत सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांना तात्काळ सूचित करावे. तसेच, सदरची बाब सर्व उमेदवारांच्या निदर्शनास देखील आणावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

आपला,

(के.सूर्यकृष्णमूर्ती)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र